# वस्तू व सेवा कर कर्मचारी सहकारी पतपेढी मर्यादित, मुंबई

**(कार्यक्षेत्र : मुंबई / नवी मुंबई / रायगड / पालघर)**

(नोंदणी क्रमांक : बी.ओ.एम./आर.एस.आर./२२८/सन १९६४)

एक पाऊल **प्रगतीचे** (Progress)
एक पाऊल **आधुनिकतेचे** (Technology)



"आता संस्था तुमच्या अगदी जवळ...
बोटाच्या **एका क्लिकवर**"






## ६२ वा वार्षिक अहवाल
**२०२५-२०२६**

**लेखापरीक्षण "अ" वर्ग**





मुख्य कार्यालय : वस्तू व सेवा कर भवन, डी–१, तळमजला, माझगांव, मुंबई–१०. Email : gstsoc1964@gmail.com | Website : www.gstsoc.org
Mobile App : SARATHEE | Whatsapp Chatbot No.: 8424005211 माझगांव : ८४२४००५२०६, वांद्रे : ८४२४००५२०७, कोकण भवन : ८४२४००५२०८
दूरध्वनी : २३७६००१४ / २३७४४३०७ (माझगांव), २६५९१५१५ (वांद्रे), २७५६६५५६ (कोकण भवन)

# संचालक मंडळ

(सन २०२२-२०२३ ते २०२६-२०२७)



**सुदाम रा. गवळी**
पदसिध्द अध्यक्ष



**प्रमोद रा. तावडे**
कार्याध्यक्ष



**विजय शां. मोरे**
प्रमुख कार्यवाह



**सुरेश पां. घोसाळकर**
कोषाध्यक्ष



**मंगेश आ. साईल**
कार्यवाह



**मनोज र. पाटील**
सहकार्यवाह (वांद्रे)



**सुबोध बा. लवटे**
सहकार्यवाह (कोकण भवन)



**संजय वृ. वर्तक**
सहकोषाध्यक्ष

## संचालक



**हर्षवर्धन वा. मिर्के**



**गणेश वि. सोनवणे**



**प्रतिमा मं. कांदळगांवकर**



**समाधान भ. सुर्वे**



**रामेश्वर वि. पाटील**



**भाऊसाहेब जी. पांढरे**



**संतोष जा. सरवदे**



**मयुर चं. खामकर**



**सुनिता वै. नागपूरे**



**सुलेखा अ. पहुरकर**



**विजय मु. सोनवणे**



**कुणाल पु. जाधव**



**संजय शि. केळशीकर**
व्यवस्थापक

# ६२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा सूचना

पतपेढी सभासदांची सन २०२५-२०२६ ची ६२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा गुरुवार, दि. १० सप्टेंबर, २०२६ रोजी सायंकाळी ठीक ६.०० वाजता, वस्तू व सेवा कर उपाहारगृह, माझगांव, मुंबई-४०० ०१० येथे पतपेढीचे पद्सिध्द अध्यक्ष **मा. श्री. सुदाम रामकृष्ण गवळी साहेब** यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेली आहे. तरी सर्व सभासदांनी सभेस वेळेवर उपस्थित रहावे.

## सभेपुढील विषय

१. दिनांक १९ सप्टेंबर, २०२५ रोजी संपन्न झालेल्या ६१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या वृत्तांताचे वाचन व मंजूरी.
२. सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षाच्या अहवालावर चर्चा करणे.
३. सन २०२५-२०२६ चे नफा तोटा पत्रक, दिनांक ३१ मार्च, २०२६ चे ताळेबंद व सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षाचे अंदाज पत्रक चर्चा करून स्विकृत करणे.
४. संचालक मंडळाने सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षाची प्रस्तावित केलेली नफा विभागणी चर्चा करुन कायम करणे.
५. सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षाकरीता वैधानिक लेखापरीक्षक व अंतर्गत लेखापरीक्षक यांची नियुक्ती करणे.
६. संचालक मंडळाने अहवालात प्रस्तावित केलेल्या उपविधी दुरुस्ती व ठरावांना मंजूरी देणे.
७. ६२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेतील सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.
८. अध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे.

संचालक मंडळाच्या वतीने,

स्थळ : मुंबई,
दिनांक : २४ ऑगस्ट, २०२६

**विजय शां. मोरे** — प्रमुख कार्यवाह
**मंगेश आ. साईल** — कार्यवाह

## सूचना

१) गणपूर्ती अभावी सभा तहकूब झाल्यास, त्याच ठिकाणी सभा अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल व त्या सभेस गणसंख्येचे बंधन असणार नाही.
२) विषय पत्रिकेवरील पहिला विषय संपल्यानंतर सर्वप्रथम चर्चेकरीता महिला सभासदांसाठी एक तासाचा वेळ राखून ठेवला जाईल. त्यांना विषय पत्रिकेतील सर्व विषयांवर मत मांडण्याची प्रथम संधी दिली जाईल, तद्नंतर इतर सभासदांना विषयाच्या अग्रक्रमानुसार बोलण्याची संधी दिली जाईल.
३) सभासदांना सर्वसाधारण सभेकरीता काही सूचना/ठराव द्यावयाचे असल्यास कार्यालयीन कामकाजाचे वेळेत दि .०७/०९/२०२६ पर्यंत पतपेढी कार्यालयात द्यावीत.
४) सन २०२५-२०२६ या अहवाल वर्षाच्या हिशोबाचे सर्व अभिलेख पतपेढी मुख्यालय, माझगांव येथे सभासदांच्या कामकाजाचे वेळेत उपलब्ध असतील. सभासदांना हिशोबाच्या संदर्भात काही तपशील पाहिजे असल्यास त्यांनी वर नमूद केलेल्या कालावधीत संस्थेच्या मुख्य कार्यालयात कार्यालयीन वेळेत संस्थेचे प्रमुख कार्यवाह, कोषाध्यक्ष किंवा व्यवस्थापक यांचेकडे प्रत्यक्ष भेट द्यावी.
५) सभेस येताना अहवालाची प्रत कृपया सोबत आणावी, हि विनंती.

# मनोगत...

सन्माननीय सभासद बंधू-भगिनींनो,

भारतीय संस्कृतीत ''सहकाराकडून समृध्दीकडे'' हा विचार केवळ घोषवाक्य नाही, तर तो आपल्या समाजजीवनाचा दृढ पाया आहे. अनेक हात एकत्र आल्यावर, अनेक मने एकाच ध्येयासाठी कार्य करु लागल्यावर अशक्य वाटणारी उद्दिष्टेही सहज साध्य होतात. प्रत्येक व्यक्ती जेव्हा दुसऱ्याच्या प्रगतीत स्वतःचा आनंद शोधू लागते तेव्हाच सहकाराचा खरा अर्थ साकार होतो. आपल्या कर्मचारी सहकारी पतसंस्थेची उभारणीही अशाच विश्वास, एकजूट आणि परस्पर सहकार्याच्या भक्कम पायावर झालेली आहे.

आपल्या पतपेढीने देखील ६२ वर्षांचा यशस्वी प्रवास करुन ६३ व्या वर्षात मार्गक्रमण केले आहे. सभासदांनी व्यवस्थापक मंडळावर दाखविलेला विश्वास आणि दिलेले सहकार्य व पारदर्शी व्यवस्थापन यामुळे संस्थेच्या प्रगतीचा आलेख सातत्याने उंचावत ठेवण्याची परंपरा कायम राखण्यात व्यवस्थापक मंडळ यशस्वी झाले आहे. हे विनम्रपणे नमूद करुन सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षाचे नफा तोटा पत्रक, ताळेबंद पत्रक, नफा विभागणी व २०२६-२०२७ चे अंदाजपत्रक मंजुरीसाठी आपणासमोर सादर करीत आहोत.

मागील वर्षभरात पतपेढीच्या ठेवी, कर्ज वाटप, सभासद संख्या आणि एकूण व्यवसायामध्ये समाधानकारक वाढ झाली आहे. याचाच परिपाक म्हणून आपल्या संस्थेची वार्षिक उलाढाल ₹ २७५ कोटी पर्यंत पोहचली आहे.

संचालक मंडळाने योग्य पद्धतीने आर्थिक नियोजन केल्यामुळे संस्थेला ₹ ६.११ कोटी इतका निव्वळ नफा प्राप्त झाला असून, सभासदांना देण्यात येणारा लाभांश १५% संचित ठेवीवरील व्याज ९% दराने व सभासद भविष्य सहाय्य निधीवर बोनस ५% दराने प्रस्तावित करण्यात येत आहे.

आपल्या पतपेढीने सभासदांचे आरोग्य, सुरक्षितता आणि सामाजिक बांधिलकी यांना सर्वोच्च प्राधान्य देत आरोग्य विषयक विमा योजनेत म्हणजेच आपल्या भविष्य सहाय्य निधी योजनेतून ₹ १२.५० लाखावरुन ₹ १५ लाख इतकी वाढ करण्याचे तसेच वैद्यकीय अग्रीम (बिनव्याजाचे) ५ गंभीर आजारांकरीता ₹ १ लाखावरुन ₹ २ लाख करण्याचे तसेच वैद्यकीय कर्ज ₹ ३ लाखावरुन ₹ ५ लाख इतके (विद्यमान कर्ज व्याज दरापेक्षा २% कमी दराने) देण्याबाबत प्रस्तावित करुन सभासदांच्या गरजांना अधिक सक्षम प्रतिसाद देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

डिजिटल इंडीयाच्या बदलत्या स्वरुपानुसार आपली संस्थाही संगणकीकरण करण्यात नेहमीच अग्रेसर राहीलेली आहे. मुदतठेवीचे मुदतपूर्ती दिवशी, मुदतठेव परस्पर पुनर्गुंतवणूक (Auto Renewal) करण्याची सुविधा आपल्याकडे आहेच, तसेच मोबाईल **'SARATHEE'** ॲपव्दारे सभासदांना त्यांच्या वैयक्तिक खात्याविषयी अद्ययावत माहिती सहज उपलब्ध होत आहे. संस्थेच्या वेबसाईटवर पतपेढीच्या कामकाजा संबंधित फॉर्म सभासदांकरीता उपलब्ध करण्यात आलेले आहेत.

आजच्या या झपाट्याने बदलणाऱ्या डिजिटल युगात प्रत्येकाच्या हातात मोबाईल असून माहिती जलद

व सहजपणे उपलब्ध होणे ही काळाची गरज बनली आहे. ही गरज ओळखून आपल्या पतसंस्थेने ''व्हॉटसअप चॅटबोट (WHATSAPP CHATBOT)'' च्या माध्यमातून सभासदांना त्यांच्या खात्याशी संबंधित माहिती, कर्ज व ठेवी विषयक तपशील व इतर आवश्यक माहिती एका क्लिकवर उपलब्ध करुन दिली आहे. तसेच वैयक्तिक खात्याची माहिती उतरवण्याची (Download) करण्याची सुविधा असल्यामुळे माहिती तात्काळ उपलब्ध होऊन वेळेची बचत होईल.

सामाजिक बांधिलकी जपत गरजूंच्या मदतीसाठी सदैव पुढाकार घेण्याचा पतपेढीने कायम प्रयत्न केला आहे. त्याचाच एक प्रत्यय म्हणजे मराठवाड्यातील पुरग्रस्त बांधवांसाठी केलेली मदत.

मराठवाड्यात अचानक उद्‌भवलेल्या पुरपरिस्थितीमुळे तेथील अनेक कुटूंबाचे मोठे नुकसान झाले, त्यावेळी पुरात विद्यार्थ्यांचे शैक्षणिक साहित्यही वाहून गेले, अशा संकटकाळात विद्यार्थ्यांचे शिक्षण खंडित होऊ नये, या सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून पतपेढीने महाराष्ट्र वस्तू व सेवाकर कर्मचारी संघटनेच्या माध्यमातून मराठवाड्यातील पुरग्रस्त विद्यार्थ्यांना रु. १ लाख इतक्या रक्कमेचे शैक्षणिक साहित्याचे किट वाटप करण्यात आले. या माध्यमातून पतपेढीने आपली सामाजिक बांधिलकी जपत मदतीचा एक छोटासा, खारीचा वाटा उचलण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला.

आजपर्यंत आपल्या संस्थेने केलेली उल्लेखनीय वाटचाल ही केवळ आकडेवारीतील वाढ नसून, सभासदांचा दृढ विश्वास, संचालक मंडळाची दूरदृष्टी व पतपेढी कर्मचाऱ्यांचे परिश्रम आणि प्रत्येक सभासदाचे सातत्यपूर्ण सहकार्य याचेच हे यशस्वी फलित आहे.

आपली संस्था केवळ आर्थिक व्यवहार करणारी संस्था नसून, सभासदांच्या सुख–दुःखात सदैव सहभागी होणारे एक विश्वासाचे कुटुंब आहे. भविष्यातही पारदर्शकता, प्रामाणिकपणा आणि सेवाभावीवृत्ती जपत सभासदांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देत ही संस्था अशीच प्रगतीची अधिकाधिक वाटचाल करीत राहील असा ठाम विश्वास संचालक मंडळाच्यावतीने आम्ही आपणांस देत आहोत.

कोणतीही संस्था ही व्यक्तीपेक्षा मोठी असते आपण आपल्या संस्थेवर दाखवलेला विश्वास हीच आमची प्रेरणा, आमचे बळ आणि संस्थेच्या उज्जवल भविष्याची सर्वात मोठी शिदोरी आहे. आपला हा विश्वास अधिक दृढ करण्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील राहू, असे आपणांस आश्वासित करीत आहोत.

आपल्या सर्वांच्या आरोग्यासाठी व आर्थिक प्रगतीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा!

**जय हिंद !** **जय महाराष्ट्र !!** **जय सहकार !!**

आपले सहकारी,

| | |
|---|---|
| **प्रमोद रा. तावडे** | **विजय शां. मोरे** |
| कार्याध्यक्ष | प्रमुख कार्यवाह |

**संचालक मंडळाच्या सभा :**

अहवाल वर्षात संचालक मंडळाच्या एकूण १४ सभा झाल्या. सभेतील उपस्थितीचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| संचालकाचे नाव | पद | सभेची उपस्थिती |
|---|---|---|
| श्री. प्रमोद रामचंद्र तावडे | कार्याध्यक्ष | १३ |
| श्री. विजय शांताराम मोरे | प्रमुख कार्यवाह | १४ |
| श्री. सुरेश पांडुरंग घोसाळकर | कोषाध्यक्ष | १४ |
| श्री. मंगेश आत्माराम साईल | कार्यवाह | १४ |
| श्री. मनोज रघुनाथ पाटील | सहकार्यवाह (वांद्रे) | १२ |
| श्री. सुबोध बापूसाहेब लवटे | सहकार्यवाह (को.भ.) | १० |
| श्री. संजय वृन्दावन वर्तक | सहकोषाध्यक्ष | १२ |
| श्री. हर्षवर्धन वामन मिर्के | संचालक | १३ |
| श्री. गणेश विष्णू सोनवणे | संचालक | १३ |
| श्रीमती प्रतिमा मंगेश कांदळगांवकर | संचालिका | १० |
| श्री. समाधान भगवान सुर्वे | संचालक | १२ |
| श्री. रामेश्वर विरभद्र पाटील | संचालक | १४ |
| श्री. भाऊसाहेब जीवन पांढरे | संचालक | १२ |
| श्री. संतोष जालिंदर सरवदे | संचालक | ०७ |
| श्री. मयुर चंद्रकांत खामकर | संचालक | १२ |
| श्रीमती सुनिता वैभव नागपूरे | संचालिका | १४ |
| श्रीमती सुलेखा अरविंद पहुरकर | संचालिका | १२ |
| श्री. विजय मुरलीधर सोनवणे | संचालक | १२ |
| श्री. कुणाल पुरुषोत्तम जाधव | संचालक | १२ |

**सभासद संख्या, भाग भांडवल व संचित ठेव :**

अहवाल वर्षात संस्थेचे २८४ नवीन सभासद झालेले असून, सेवानिवृत्ती व अन्य कारणाने १९३ सभासद कमी झालेले आहेत. वर्षअखेरीस संस्थेचे ४४०३ नियमित सभासद व ३०८३ नाममात्र सभासद नोंदीत आहेत.

वर्षअखेरीस संस्थेकडे ₹ ३,१५,२०,५०२/- एवढी भाग भांडवलाची रक्कम असून, सभासदांना यंदाही भाग भांडवलाच्या रकमेवर १५% दराने लाभांश प्रस्तावित करण्यात आला आहे. तसेच मासिक वर्गणीच्या रुपात जमा होत असलेल्या संचित ठेवीमध्ये ₹ ४१,५४,९२,९२०/- एवढी रक्कम जमा झाली असून, या रकमेवर ९% दराने व्याज प्रस्तावित करण्यात आले आहे.

| तपशील | सभासद संख्या | भाग भांडवल | संचित ठेव |
|---|---|---|---|
| वर्षारंभी | ४३१२ | ३,०४,३५,६०२.०० | ३८,५२,६०,४८०.०० |
| वर्षभरातील वाढ | २८४ | २७,७६,५००.०० | ५,६०,४०,३९३.०० |
| वर्षभरातील घट | १९३ | १६,९१,६००.०० | २,५८,०७,९५३.०० |
| वर्षअखेरीस | ४४०३ | ३,१५,२०,५०२.०० | ४१,५४,९२,९२०.०० |

**राखीव निधी :**

राखीव निधी ही संस्थेची गंगाजळी आहे. संस्थेची आर्थिक स्थिती उत्तम असून, वर्षअखेर संस्थेकडे ₹ १०,१८,०८,२३२.३८ एवढी रक्कम राखीव निधीत आहे.

**निवृत्त सभासद कल्याण निधी :**

निवृत्ती अथवा इतर कारणाने पतपेढीचे सभासदत्व बंद करणाऱ्या सभासदांना त्यांचा पतपेढीतील सभासदत्वाचा कालखंड विचारात घेऊन सदर निधीतून भेट स्वरुपात ठराविक रक्कम दिली जाते. अहवाल वर्षात या निधीतून ₹ ८,०६,०९९/- एवढी रक्कम संस्थेकडून राजीनामा दिलेल्या सभासदांना देण्यात आली आहे. वर्षाअखेर संस्थेकडे ₹ १,८८,८९,५१४/- एवढी रक्कम निधीत जमा आहे.

**सभासद भविष्य सहाय्य निधी :**

मृत सभासदांच्या वारसांना आर्थिक सहाय्य करण्याच्या उद्देशाने स्थापन केलेल्या या योजनेची सलग २० वर्षे पूर्ण झालेली आहेत. संस्थेच्या वतीने अहवालसाली ६ मृत सभासदांच्या वारसांना या निधीच्या माध्यमातून ₹ ६२,१९,८३०/- इतके सहाय्य देण्यात आले आहे. ज्यायोगे कर्ज परतफेडीचा वारसावर पडलेला आर्थिक भार बऱ्याच प्रमाणात कमी होऊन त्यांना संस्थेकडून आर्थिक व मानसिक आधार मिळाला आहे. अहवालसाली सभासदत्वाचा राजीनामा दिलेल्या सभासदांना ₹ १,३०,८९,३७४/- इतकी त्यांची वर्गणी परत करण्यात आली आहे.

भविष्य सहाय्य निधीतील जमा रकमेवर ५% दराने बोनस ₹ ९८,६८,४२२/- इतकी रक्कम संस्थेकडून वाटप करण्यात आली आहे. अहवाल वर्षातील जमा रकमेवर ५% दराने बोनस प्रस्तावित करण्यात आला आहे. या निधीच्या व्याजातून मिळणाऱ्या अर्जित उत्पन्नावर मागील २० वर्षांमध्ये खालीलप्रमाणे वर्ष निहाय २९३ मयत सभासदांच्या वारसांना संस्थेच्या वतीने ₹ ९,४५,५९,०१०/- इतके आर्थिक सहाय्य करण्यात आले आहे.

| वर्ष | मयत सभासदांची संख्या | वारसांना दिलेली लाभाची रक्कम |
|---|---|---|
| २००६-२०१६ | १७७ | २,४८,६१,५००/- |
| २०१६-२०१७ | १७ | ५८,४२,०००/- |
| २०१७-२०१८ | ९ | ३९,९४,०००/- |
| २०१८-२०१९ | १५ | ७९,७०,०००/- |
| २०१९-२०२० | ९ | ३८,७८,१८०/- |
| २०२०-२०२१ | २० | १,१०,५६,०००/- |
| २०२१-२०२२ | १८ | १,००,९७,०००/- |
| २०२२-२०२३ | १३ | १,२१,०१,५००/- |
| २०२३-२०२४ | ६ | ५३,१२,०००/- |
| २०२४-२०२५ | ३ | ३२,२७,०००/- |
| २०२५-२०२६ | ६ | ६२,१९,८३०/- |
| **एकूण** | **२९३** | **९,४५,५९,०१०/-** |

## सन २०२५-२०२६ या वर्षात मयत सभासदांच्या वारसांना देण्यात आलेली रक्कम

| अ.क्र. | खाते क्रमांक | मयत सभासदाचे नांव | वितरीत रक्कम |
|---|---|---|---|
| १ | ६६८१ | कै. जितेंद्र फत्तेसिंग पाटील | १२,५०,०००/- |
| २ | १०३४३ | कै. ज्योती जयप्रकाश मिसार | ७,८०,०००/- |
| ३ | ८५७३ | कै. धनंजय धर्मराज कोळी | ९,६९,०००/- |
| ४ | ८७८८ | कै. जयंत सदाशिव सोरटे | ११,१४,०००/- |
| ५ | ६७३४ | कै. स्वाती संदीप सिनकर | ११,४९,८३०/- |
| ६ | ९६८९ | कै. संदिप दिलीप सोनवणे | ९,५७,०००/- |
| | | **एकूण** | **६२,१९,८३०/-** |

सभासदांच्या कर्जाचा भार कमी करण्याच्या दृष्टीने सदर योजने अंतर्गत सभासदांच्या वारसांना लाभ ₹ १२,५०,०००/- इतक्या रकमेची आर्थिक मदत देण्यात येत आहे.

**वैद्यकीय बिनव्याजी अग्रीम व वैद्यकीय कर्ज सुविधेत वाढ :-**

काळानुरूप वाढता वैद्यकीय खर्चाचा विचार करून सभासदांना आरोग्यविषयक अडचणीच्या प्रसंगी अधिक आर्थिक आधार मिळावा या उद्देशाने वैद्यकीय बिनव्याजी अग्रीम तसेच वैद्यकीय कर्ज कमी व्याजदरावरील कर्जाच्या रक्कमेची मर्यादा वाढविण्यात आली आहे. या सुविधेमुळे सभासदांना उपचारांच्या वेळी तातडीने आर्थिक मदत उपलब्ध होऊन त्यांच्यावरील आर्थिक ताण कमी होण्यास मदत होणार आहे. सभासदांचे आरोग्य व हित लक्षात घेऊन संस्थेने घेतलेला हा महत्वपूर्ण आणि सभासदाभिमुख निर्णय आहे.

**सभासद भविष्य सहाय्य निधी :-**

सभासद भविष्य सहाय्य निधी योजनेअंतर्गत विमा संरक्षण वाढविण्याबाबत विविध कंपन्यांकडून माहिती व प्रस्ताव मागविण्यात आले, परंतू विमा कंपन्यांकडून देण्यात येणारा वाढीव विमा हप्ता व त्यासाठी लागणारी रक्कम तुलनेने अधिक असल्याचे निदर्शनास आले, त्यामुळे सभासदांवर अतिरिक्त भार पडू नये याचा विचार करून संस्थेच्या माध्यमातूनच सभासद भविष्य सहाय्य निधी योजनेची रक्कम वाढविण्याचा निर्णय घेण्यात येत आहे. त्यामुळे सभासदांना अधिक सुरक्षितता मिळणार असून संस्थेच्या सभासदहिताच्या भूमिकेला अधिक बळकटी मिळणार आहे.

## सभासद भविष्य सहाय्य निधीची नियमावली

* **सभासद भविष्य सहाय्य निधी योजनेअंतर्गत कमाल मर्यादा ₹ १२.५० लाखावरुन ₹ १५ लाख पर्यंत वाढविण्याचा ठराव अहवाल वर्षात संचालक मंडळ प्रस्तावित करीत आहे. (नियमावली खालीलप्रमाणे)**

१ सदर योजना संस्थेच्या सर्व नियमित सभासदांना (सेवेत असलेले सभासदांना) बंधनकारक राहील.

२ सदर योजनेची वर्गणी दरमहा ₹ १२००/- असून ती सभासदांच्या मासिक वेतनातून नियमित भरणा करणे आवश्यक आहे.

३ सदर लाभ सभासदांची भविष्य सहाय्य निधीतील वैयक्तिक जमेच्या पटीत अनुज्ञेय व कमाल सहाय्य रुपये १५,००,०००/- इतकी आहे.

४ सभासदांच्या नांवे संस्थेचे कर्ज दायित्व असल्यास, संबंधित सभासदास अनुज्ञेय असलेला लाभ संचालक मंडळाच्या सभेच्या मान्यतेने सभासदाचे कर्ज दायित्वात वळते करण्यात येईल. त्याकरीता मयत सभासदाचे वारसदार अथवा जामिनदार यांच्या संमतीची आवश्यकता राहणार नाही.

५ सभासदांच्या सेवा निवृत्ती/स्वेच्छा निवृत्ती नंतर सभासदास सदर योजनेचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही. मात्र योजनेतील त्यांच्या खाती जमा असलेल्या रकमेचा परतावा देण्यात येईल.

**सभासद भविष्य सहाय्य निधीची सूत्र :-**

* नवीन सभासदत्व स्विकारल्यापासून पहिल्या चार महिन्यापर्यंत सभासदांच्या वैयक्तिक जमेच्या कमाल २० पट किंवा ₹ १ लाख यापैकी जे जादा असेल ते.
* नवीन सभासदत्व स्विकारल्यापासून चार महिन्यानंतर वैयक्तिक जमा ₹ ३० हजारापर्यंत जमेच्या २० पट व ₹ ३० हजारापुढील ते ६० हजारापर्यंत १५ पट व त्यापुढील रकमेच्या १० पट किंवा ₹ १५ लाख यापैकी जे कमी असेल ते.
* **योजनेचे यापूर्वीचे सर्व नियम जसेच्या तसे लागू होतील. योजनेत कोणतेही बदल करण्याचे अधिकार संचालक मंडळास राहतील.**

## कर्जे (परिशिष्ट–क)

अहवाल वर्षारंभी ₹ २१४,३४,५८,०७६/– इतकी रक्कम कर्ज खाती शिल्लक होती. अहवाल वर्षअखेरीस ₹ २१९,१५,८८,०९८/– इतकी रक्कम कर्ज खाती शिल्लक आहे.

## वैद्यकीय कर्ज /वैद्यकीय अग्रीम :

सभासदांना स्वत:चे रूग्णालयीन (Hospitalisation) आजारावरील उपचार तसेच शस्त्रक्रियेकरीता, ७% इतक्या कमी व्याजदराने जास्तीत जास्त रूपये ३ लाख इतके वैद्यकीय कर्ज तसेच ₹ ५० हजार बिनव्याजी वैद्यकीय अग्रीम व पाच गंभीर आजारांकरीता ₹ १ लाख बिनव्याजी देण्यात येते. अहवाल वर्षात ६ सभासदांना वैद्यकीय कर्ज व वैद्यकीय अग्रीम देण्यात आले.

## ठेवी : (परिशिष्ट–ब)

संस्थेतील ठेवींवरुन कोणत्याही पतपेढीची पत जोखता येते. अहवाल वर्षारंभी ₹ १५९,७८,८८,०५७/– इतकी रक्कम संचित ठेव, आवर्त ठेव व मुदत ठेवीतील गुंतवणूकीत होती. वर्षअखेरीस ₹ १८०,८४,१०,९८४/– इतकी रक्कम ठेवीत जमा आहे. या आकड्यांवरून सभासदांची पतपेढीवर पर्यायाने संचालक मंडळावर असलेली निष्ठा व अतूट विश्वास प्रतीत होत आहे, याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे.

सभासदांनी गुंतवणूक केलेली मुदत ठेव, आवर्त ठेव, यांची मुदतपूर्तीची पूर्वकल्पना त्यांना लघूसंदेश (SMS) तसेच "SARATHEE" ॲपद्वारे व मोबाईल व्हॉट्सॲप (WHATSAPP) (USED FOR CHATBOT ) ॲपद्वारे सभासदांना त्यांच्या खात्यावरील ठेवींची व इतर माहिती उपलब्ध करुन दिली जाते.

## विश्रामगृह योजना :

संस्थेच्या मालकीच्या मुरबाड, पाम व्हिलेज स्थित विश्रामगृहाला सभासदांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, ₹ १,६५,८७०/– इतके विश्रामगृहाचे आरक्षण शुल्क अहवाल वर्षात प्राप्त झाले आहे. सभासदांच्या वेळोवेळी झालेल्या मागणीनूसार १० रुम पैकी ६ रुम वातानुकूलित करण्यात आलेल्या आहेत. तसेच विश्रामगृह देखभाल व आवश्यक सुविधांकरीता रूपये २ लाख इतक्या रकमेची या योजनेच्या निधीत तरतूद करण्यात आली आहे.

## सभासद स्नेहमेळावा व पाल्यांचा गुणगौरव :-

आपल्या पतपेढीचे सभासद स्नेहमेळावा व त्यांच्या गुणवान पाल्यांचा गुणगौरव सोहळा शुक्रवार **दिनांक १३ फेब्रुवारी २०२६** रोजी श्री छत्रपती शिवाजी महाराज मंदिर नाटयगृह, दादर येथे समारंभाचे अध्यक्ष **मा. श्री. आशीष शर्मा साहेब (भा.प्र.से.)** मा. राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य व विशेष अतिथी **मा. श्री. नितीन पाटील साहेब (भा.प्र.से.)** विशेष राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, **मा. श्री. राजेंद्र दौ. अडसूळ साहेब**, सदस्य महाराष्ट्र विक्रीकर न्यायाधिकरण, मुंबई तथा पदसिध्द अध्यक्ष, वस्तू व सेवा कर कर्मचारी सहकारी पतपेढी मर्यादित, मुंबई **मा. श्री. हर्षकुमार व. निकम साहेब** अपर राज्यकर आयुक्त, मुंबई तसेच **मा. श्री. सुदाम रा. गवळी साहेब** अपर राज्यकर आयुक्त, मुंबई यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. सदर सोहळयास खात्यातील सर्व संघटना, संस्था, समित्या यांचे पदाधिकारी, प्रतिनिधी व सन्मानीय सभासद व त्यांची गुणवान पाल्य उपस्थित होते.

या समारंभात राष्ट्रीय कला, क्रिडा स्पर्धा शिष्यवृत्ती तसेच माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परिक्षेमध्ये व उच्च माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परिक्षेमध्ये विशेष यश संपादन केलेल्या सभासदांच्या गुणवान पाल्यांचा तसेच कला-क्रिडा व विभागीय परीक्षेत विशेष कामगिरी केलेल्या सभासदांचा गौरव करण्यात आला तसेच खात्यातील सर्व संघटना, संस्था, समित्या यांनी पतपेढीकरीता नेहमीच दिलेल्या भरीव योगदानांकरीता पुष्पगुच्छ देवून सन्मानित करण्यात आले.

पतपेढीचे **प्रमुख कार्यवाह श्री. विजय शां. मोरे** यांनी आपल्या प्रस्तावनेत पतपेढीने मागील ६२ वर्षातील पतसंस्थेची वाटचाल तसेच पतपेढीच्या सोई सुविधांबाबतची माहिती देवून भविष्यात मोबाईल व्हॉटसअॅपच्या माध्यमातून सभासदांच्या कर्जाची व ठेवींची माहीती उपलब्ध करून देण्यात येईल असे मनोगत व्यक्त केले. **कार्याध्यक्ष श्री. प्रमोद रा. तावडे** यांनी सभासदांकरीता राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजना व उपक्रम तसेच संस्थेचा आलेख कसा उंचावत जात आहे याचे विश्लेषण केले.

**मा. श्री. सुदाम रा. गवळी साहेब, अपर राज्यकर आयुक्त** यांनी या पतसंस्थेची सातत्यपूर्ण प्रगती सभासदांप्रती असलेली बांधिलकी आणि सेवाभाव, निश्चितच कौतुकास्पद आहे. पतपेढी ही नेहमीच सभासदांच्या हिताचे उपक्रम राबवित असून पतपेढीच्या अशाच उत्तरोत्तर प्रगतीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

**मा. हर्षकुमार व. निकम साहेब, अपर राज्यकर आयुक्त** यांनी आपल्या पतसंस्थेची सातत्यपूर्ण होणारी प्रगती, पारदर्शक कारभार, सभासदांचा पतसंस्थेवर असलेला दृढ विश्वास आणि संचालक मंडळाचे दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व यामुळे ही संस्था भविष्यात आणखी उंच भरारी घेईल असा ठाम विश्वास व्यक्त केला व संस्थेची ही वाटचाल अशीच सुरू राहावी अशा सदिच्छा व्यक्त केल्या.

**कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. श्री नितीन पाटील साहेब (भा.प्र.से), विशेष राज्यकर आयुक्त महाराष्ट्र राज्य** यांनी पतपेढी करीत असलेले पारदर्शक कामाचे अभिनंदन केले. तसेच या पतसंस्थेचा सभासद गुणगौरव सोहळा हा केवळ पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम नसून, सभासदांप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा आणि त्यांच्या पाल्यांच्या यशाचा गौरव करणारा प्रेरणादायी उपक्रम आहे. संस्थेने आर्थिक सेवे सोबतच सामाजिक, शैक्षणिक आणि कौटुंबिक बांधिलकी जपली असून हि अत्यंत कौतुकास्पद बाब आहे. असे विचार व्यक्त केले व संस्थेस पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी गौरी थिएटर निर्मित व प्रशांत दामले फॅन फाउंडेशन प्रकाशित **'कुटुंब किर्रतन'** या व्यवसायिक नाटकाचा प्रयोग सादर करण्यात आला. सदर कार्यक्रमाचा सर्व सन्मानीय सभासद बंधु-भगिनी व त्यांच्या पाल्यांनी मनमुराद आनंद घेतला.

**अभिनंदन :**

अहवाल दिनांकापर्यंत ज्या सभासदांना पदोन्नती प्राप्त झाली. विभागीय परीक्षेत यश प्राप्त केले, कला, क्रिडा व सांस्कृतिक क्षेत्रात राष्ट्रीय, राज्य स्तरावर प्राविण्य मिळविले. तसेच ज्या सभासदांच्या पाल्यांनी फेब्रुवारी २०२६ व मार्च २०२६ या वर्षांमध्ये माध्यमिक शालान्त व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा व शिष्यवृत्ती परीक्षेत अर्हता प्राप्त केली, अशा सर्वांचे मन:पूर्वक अभिनंदन!

**आभार, शुभेच्छा व स्वागत :**

अहवाल वर्षामध्ये आपल्या पतसंस्थेचे माजी पदसिध्द अध्यक्ष आयुक्तांचे प्रतिनिधी **मा. श्री. राजेंद्र अडसूळ साहेब यांची पूणे न्यायाधिकरण सदस्य** या पदावर नियुक्ती झाली आहे. मा. राजेंद्र अडसूळ साहेब यांच्या अध्यक्ष पदाच्या कार्यकाळात त्यांनी पतसंस्थेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी दूरदृष्टी, प्रामाणिक नेतृत्व आणि सातत्यपूर्ण मार्गदर्शन दिले. सभासद हिताला प्रथम प्राधान्य देत संस्थेच्या आर्थिक स्थैर्या बरोबरच विविध संगणीकृत उपक्रमांना त्यांनी चालना दिली. **मा. श्री. राजेंद्र अडसूळ साहेबांना** त्यांच्या पुढील कार्यासाठी संचालक मंडळाच्यावतीने हार्दिक शुभेच्छा !

**श्री. सुबोध बा. लवटे सहकार्यवाह, कोकणभवन** हे दिनांक ३१ मे २०२६ रोजी शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाले असून, त्यांनी सहकार्यवाह (कोकणभवन) पदी कार्यरत असताना सभासदांना तात्काळ सेवा पुरविण्याबाबत मोलाचे सहकार्य केले. त्यांच्या सेवाभावी योगदानाबद्दल पतपेढीच्यावतीने त्यांचे मन:पूर्वक आभार व सेवानिवृत्ती नंतरच्या पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा!

अहवाल वर्षात संस्थेच्या वाटचालीसाठी ज्या ज्या सभासदांनी सहकार्य केले अशा सर्व सन्माननीय सभासदांचे आभार!

अहवाल वर्षात पतपेढीच्या ज्या सभासदांनी स्वेच्छासेवानिवृत्ती स्विकारली, जे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. त्या सर्वांना सेवानिवृत्तीच्या हार्दिक शुभेच्छा! निवृत्तीनंतरच्या आयुष्याच्या नविन पर्वात आपली ओंजळ सुख-समाधानाने व आनंदाने पूर्ण भरलेली राहो ही ईश्वरचरणी प्रार्थना. सेवानिवृत्तीनंतर ज्या सभासदांनी पतपेढीचे नाममात्र सभासदत्व स्विकारले आहे, त्या सर्वांचे मन:पूर्वक आभार!

**विनम्र श्रध्दांजली :**

विभागातील अहवाल दिनाकांपर्यंत पतपेढीचे जे आजी माजी सभासद, ठेवीदार, हितचिंतक व आपल्या देशाचे संरक्षणार्थ तीनही दलातील सैनिकांचे तसेच राजकीय, सहकार, सामाजिक, कला, क्रीडा, मनोरंजन क्षेत्रातील ज्या दिग्गज व्यक्तींचे निधन झाले, त्याचप्रमाणे ज्या देशवासीयांचे नैसर्गिक आपत्तीत दुर्दैवी निधन झाले, त्या सर्वांना पतपेढीच्या वतीने **भावपूर्ण श्रध्दांजली!**

**ऋणनिर्देश :**

**पतपेढीस खालील मान्यवरांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.**

१) मा. श्री. आशिषजी शर्मा साहेब (भा.प्र.से.), राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२) मा. श्री. नितीन पाटील साहेब (भा.प्र.से.) विशेष राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

३) महाराष्ट्र राज्य वस्तू व सेवा कर राजपत्रित अधिकारी संघटनेचे विद्यमान अध्यक्ष श्री. प्रदिप रणपिसे, सरचिटणीस श्री. राजेश बदर व त्यांचे सर्व संघटना सहकारी.

४) महाराष्ट्र वस्तू व सेवा कर कर्मचारी संघटनेचे विद्यमान अध्यक्ष श्री. शरद माळी, सरचिटणीस श्री. अजित भोसले व त्यांचे सर्व संघटना सहकारी.

५) महाराष्ट्र वस्तू व सेवा कर गट-ड कर्मचारी संघटनेचे विद्यमान अध्यक्ष श्री. महेश कळसकर, प्रमुख कार्यवाह श्री. संजय कडू व त्यांचे सर्व संघटना सहकारी.

६) मागासवर्गीय वस्तू व सेवा कर अधिकारी-कर्मचारी संघटनेचे विद्यमान अध्यक्ष श्री. रविंद्र मंडपे, सरचिटणीस श्री. देवेंद्र गमरे व त्यांचे सर्व संघटना सहकारी.

७) विक्रीकर कर्मचारी कल्याण निधी मुंबई, यांचे विद्यमान अध्यक्ष श्री. संजय निकम, सचिव श्री. अंकुश चौरपगार व त्यांचे सर्व सहकारी.

८) शिवजयंती उत्सव समितीचे विद्यमान अध्यक्ष श्री. सुनिल जगदाळे, सचिव श्री. कृष्णा अंभोरे व त्यांचे सर्व सहकारी.

९) वस्तू व सेवा कर जिमखाना, सांस्कृतिक विभाग, जी.एस.टी. नवदुर्गा मंच, माझगांव व वांद्रे पूजा समिती या सर्वांचे पदाधिकारी व त्यांचे सर्व सहकारी.

१०) राज्य वस्तू व सेवा कर जनसंपर्क विभागाचे राज्यकर उपायुक्त, सहायक राज्यकर आयुक्त, राज्यकर अधिकारी व त्यांचे सर्व कर्मचारी वृंद.

११) राज्य वस्तू व सेवा कर विभागातील सर्व राज्यकर सहआयुक्त, आस्थापना अधिकारी व पतपेढीच्या वसूलीकरीता सहकार्य करणारे त्यांचे सर्व कर्मचारी वृंद.

१२) महाव्यवस्थापक, वस्तू व सेवा कर विभाग, माझगांव व वांद्रे उपाहारगृह व त्यांचे सर्व कर्मचारी वृंद.

१३) मुंबई-कोकण विभागीय पगारदार पतसंस्थाचा महासंघाचे पदाधिकारी व त्यांचे सर्व सहकारी.

१४) महाराष्ट्र राज्य को-ऑपरेटिव्ह क्रेडीट सोसायटी एम्प्लॉईज युनियनचे पदाधिकारी व त्यांचे सर्व सहकारी.

१५) मा. सहकार आयुक्त व निबंधक, मा. उपजिल्हा निबंधक, मुंबई शहर-१, मा. निवडणूक निर्णय अधिकारी तथा सहायक निबंधक, ई/ए/एफ/एन विभाग, मुंबई व त्यांचे सर्व कर्मचारी वृंद.

१६) बँक ऑफ महाराष्ट्र, ॲक्सिस बँक, स्टेट बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ बडौदा, मुंबई जिल्हा मध्यवर्ती बँक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक यांचे व्यवस्थापक व त्यांचे सर्व कर्मचारी वृंद.

१७) पतपेढीचे वैधानिक लेखापरीक्षक सी.ए.-प्रदीप मिश्रा ॲण्ड कंपनी व अंतर्गत लेखापरीक्षक मे. एस. एस. एन. एम. ॲण्ड असोसिएट्स.

१८) या पतपेढीचे सर्व सन्माननीय माजी पदाधिकारी, संचालक, सभासद, नाममात्र सभासद व हितचिंतक.

या सर्वांचे आम्ही मनःपूर्वक आभार मानतो!

आपण समस्त, पतपेढीच्या संचालक मंडळाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून सभासदांकरीता विविध कल्याणकारी योजना यशस्वी करण्यासाठी तसेच पतपेढीच्या उन्नतीसाठी कायम योगदान दिले, त्याबद्दल आपणा सर्व सभासद बंधू भगिनींचे संचालक मंडळाच्यावतीने आभार मानून हा अहवाल पूर्ण करीत आहोत.

**जय हिंद !    जय महाराष्ट्र !!    जय सहकार !!!**

**संचालक मंडळाच्या वतीने,**

| | |
|---|---|
| **प्रमोद रा. तावडे** | **विजय शां. मोरे** |
| कार्याध्यक्ष | प्रमुख कार्यवाह |

## संचालक मंडळ मंजूरीसाठी सादर करीत असलेले उपविधी दुरूस्ती व ठराव

| पोटनियम | अस्तित्वात असलेल्या शब्दरचना | दुरुस्ती असलेले शब्दरचना | दुरुस्तीबाबतची कारणे |
|---|---|---|---|
| क्र. १.३ संस्थेचे अधिकृत भागभांडवल | संस्थेचे अधिकृत भागभांडवल रु. १०,००,००,०००/- (अक्षरी रुपये दहा कोटी) असेल प्रत्येक भागची दर्शनी किंमत रु. ५००/- (अक्षरी रुपये पाचशे फक्त) राहील. प्रत्येक सभासदास जास्तीत जास्त रु. १०,०००/- (अक्षरी रुपये दहा हजार फक्त) भाग धारण करता येईल. व त्यापुढील त्यांची दरमहा येणारी वर्गणीची रक्कम सभासद संचित ठेवीमध्ये घेता येईल. | संस्थेचे अधिकृत भागभांडवल रु. १५,००,००,०००/- (अक्षरी रुपये पंधरा कोटी) असेल प्रत्येक भागची दर्शनी किंमत रु. ५००/- (अक्षरी रुपये पाचशे फक्त) राहील. प्रत्येक सभासदास जास्तीत जास्त रु. १५,०००/- (अक्षरी रुपये पंधरा हजार फक्त) भाग धारण करता येतील. व त्यापुढील त्यांची दरमहा येणारी वर्गणीची रक्कम सभासद संचित ठेवीमध्ये वर्ग केली जाईल. | सभासदांच्या मोठ्या प्रमाणातील सेवानिवृत्तीमुळे सभासद संख्या कमी होत असून परिणामी संस्थेचे भाग भांडवल कमी होणे हे हितावह नाही म्हणून भाग भांडवलामध्ये वाढ होण्याकरीता. |

## ठराव १. भविष्य सहाय्य निधी योजना

पतपेढी सभासदांची ही ६२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा असा ठराव करते की, सभासद भविष्य सहाय्य निधींची कमाल मर्यादा **₹ १५,००,०००/-** पर्यंत वाढविण्यात येत आहे.

सुचक : **श्री. विजय शां. मोरे** – प्रमुख कार्यवाह
अनुमोदक : **श्री. मयुर चं. खामकर** – संचालक

## ठराव २. वैद्यकीय अग्रीम/वैद्यकीय कर्ज

पतपेढी सभासदांची ही ६२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा असा ठराव करते की, सभासदांना स्वतःचे रुग्णालयीन आजारावरील उपचाराकरीता तसेच शस्त्रक्रियेकरीता अन्य कर्जावरील विद्यमान व्याजदरापेक्षा २% कमी व्याजदराने जास्तीज जास्त **₹ ५ लाख** वैद्यकीय कर्ज मर्यादा करण्यात येत आहे.

सभासदांना स्वतःचे रुग्णालयीन आजारावरील उपचाराकरीता **₹ ५०** हजार व पाच गंभीर आजारांकरीता **₹ २ लाख** (बिनव्याजी) वैद्यकीय अग्रिम मर्यादा करण्यात येत आहे (एकत्रित मर्यादा जास्तीस जास्त **₹ २** लाख)

सुचक : **श्री. विजय शां. मोरे** – प्रमुख कार्यवाह
अनुमोदक : **श्री. विजय मु. सोनवणे** – संचालक

## न नेलेल्या लाभांशाबाबत

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ चे कलमान्वये प्रलंबित असलेला लाभांश संस्थेच्या राखीव निधीत जमा करण्याची तरतूद आहे. ज्या सभासदांनी अद्याप पर्यंत सन २०२२-२०२३ या वर्षाचा लाभांश घेतलेला नाही, त्यांनी तो पतपेढी मुख्यालय, माझगांव येथून दिनांक ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत घेऊन जाण्याची विनंती करण्यात येत आहे.

## मुदतठेव सर्वसाधारण नियम

१) मुदत ठेव गुंतवणूक/पुनर्गुंतवणूक/परतावा/व्याज या अनुषंगिक बाबत संचालक मंडळाने वेळोवेळी घेतलेल्या धोरणात्मक निर्णय व नियम सभासदांना बंधनकारक असतील.

२) मुदतपूर्व (Prematurity) परतावा : मुदतठेवीच्या दिनांकापासून ३० दिवसांपर्यंत मुदतठेवीवर कोणतेही व्याज देण्यात येणार नाही. ३१ व्या दिवसापासून पुढील कालावधीकरीता, मुदतठेवीच्या गुंतवणूकीच्या दिनांकापासून, परतावा घेण्याचे दिनांकापर्यंत पूर्ण झालेल्या कालावधीला विद्यमान व्याजदरापेक्षा १% कमी दराने व्याज देण्यात येईल.

**नफा विभागणी (सन २०२५-२०२६) :**

अहवालसालचा निव्वळ नफा ₹ ६,११,१४,०१४.७१ व मागील शिल्लक नफा ₹ ६,८९२.५२ विचारात घेता अहवालसाली ₹ ६,११,२०,९०७.२३ एवढ्या रकमेची नफा विभागणी खालीलप्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहे.

राखीव निधीची नियमानुसार २५% दराने तरतूद केल्यानंतर आर्थिक वर्षात झालेला नफा विचारात घेऊन, लाभांश १५% दराने प्रस्तावित करण्यात आला आहे. तसेच भविष्य सहाय्य निधीचा आर्थिक आढावा घेऊन, सभासदांच्या खाती जमा रकमेवर ५% दराने बोनस प्रस्तावित करण्यात आला आहे.

| सन २०२४-२०२५ | तपशिल | सन २०२५-२०२६ |
|---|---|---|
| **४,४३४.७४** | **मागील नफा शिल्लक** | **६,८९२.५२** |
| ५,४०,८७,९३७.०४ | निव्वळ नफा | ६,११,१४,०१४.७१ |
| १,३५,२१,९८४.२६ | राखीव निधी २५% प्रमाणे | १,५२,७८,५०३.५० |
| ४२,२३,४९५.०० | भागधारकांना लाभांश १५% दराने | ४३,५६,९५४.०० |
| २,५२,००,०००.०० | सभासद भविष्य सहाय्य निधी | ३,००,००,०००.०० |
| ५०,००,०००.०० | निवृत्त सभासद कल्याण निधी | ५०,००,०००.०० |
| २५,५०,०००.०० | सभासद कल्याण निधी | २७,५०,०००.०० |
| २०,००,०००.०० | विकास निधी | २०,००,०००.०० |
| ६,००,०००.०० | संचालक मंडळ मानधन | ७,००,०००.०० |
| ६,००,०००.०० | विश्रामगृह निधी | ६,००,०००.०० |
| २,१०,०००.०० | सहकार संस्कार व धर्मादाय निधी | २,००,०००.०० |
| १०,०००.०० | लाभांश समीकरण निधी | १०,०००.०० |
| १,७०,०००.०० | पतपेढी कर्मचारी बोनस/सानुग्रह अनुदान | २,२०,०००.०० |
| **६,८९२.५२** | **शिल्लक नफा पुढील वर्षाकरीता** | **५,४४९.५५** |

## १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ चे

| २०२४-२०२५ ₹ पैसे | खर्च तपशील | २०२५-२०२६ ₹ पैसे |
|---|---|---|
| | **प्रत्यक्ष खर्च** | |
| २,८९,७७,९७४.०० | जादा मुदत ठेव व्याज | ३,२५,४४,४०७.०० |
| ५,०१,९३१.०० | जादा आवर्त ठेव व्याज | ४,५२,४४३.०० |
| ६,४०,८५६.०० | संचित ठेव/भाग/व्याज | ९,२१,४७५.०० |
| ५,०७०.०० | जामीन वसुली परतावा (व्याज) | १,१५,६८७.०० |
| १७,३१,१८०.४८ | अधिकर्ष (ओडी) व्याज | ३,१३,४२०.०० |
| ७१,६५६.०० | कर्मचारी भ. नि. निधीवरील बँक व्याज | १०,०३८.०० |
| ७२,१७,७७८.०० | कर्मचारी वेतन व भत्ते | ८८,५६,३२६.०० |
| ३,३२,००४.०० | विश्रामगृह कर्मचारी वेतन व खर्च | ४,२६,७८४.०० |
| १,१४,५००.०० | मासिक सभा भत्ता खर्च | १,१७,५००.०० |
| ३,०३,१५२.१६ | सर्वसाधारण सभा खर्च | २,३६,९७७.७४ |
| ४९,८०४.०० | सत्कार समारंभ/जाहिरात खर्च | ३२,६६३.०० |
| २२,४३०.०० | तिजोरी/आगप्रतिबंध/विश्रामगृह विमा | २०,७५९.०० |
| १,२८,९२६.०० | विद्युत देयक खर्च | १,१४,०५०.०० |
| ५९,६४५.४४ | टपाल/दूरध्वनी खर्च | ५८,४४०.९२ |
| १,४२,२८३.०० | प्रवास खर्च | १,४७,०३१.०० |
| १,२७,२६६.७४ | छपाई खर्च | १,४७,३०२.१० |
| १०,०७,९१८.०० | कार्यालयीन खर्च | ७,४७,६४३.५८ |
| १,९९,२५६.४६ | किरकोळ खर्च | २,०३,९६७.२६ |
| २,५००.०० | व्यवसाय कर | २,५००.०० |
| ३,५००.०० | महासंघ / बोर्ड वर्गणी | २,२५०.०० |
| ३७,२०२.०० | न्यायालयीन व मुद्रांक शुल्क खर्च | १७,४६४.०० |
| १,५४,५८६.०० | घसारा (फर्निचर फिक्चर,वातानुकुलित यंत्र व संगणक संच/सीसीटिव्ही/मोबा.) | १,७१,५२७.०० |
| १४,५८,८११.०० | इमारत (विश्रामगृह) घसारा | १४,५८,८११.०० |
| १,३१,३८०.०० | संगणक/वातानुकुल खर्च देखभाल आकार | १,९९,३००.०० |
| ३२,४९६.८६ | धनादेश शुल्क/सेवाकर | ३३,०५७.०९ |
| १,२६,६०४.१६ | जीएसटी शुल्क | १,८०,१२९.६६ |
| ४,३५,८०,७११.३० | | ४,७५,३१,९५३.३५ |
| | **तरतूदी** | |
| ३,२४,००,०००.०० | संचित ठेव व्याज | ३,५३,३९,०००.०० |
| ५,६५,३९,०००.०० | मुदत ठेव व्याज | ६,८३,०५,२००.०० |
| ३,०८,०००.०० | आवर्त ठेव व्याज | ३,४९,१००.०० |
| २,४०,०००.०० | जागा अधिग्रहण निधी | २,४०,०००.०० |
| ५,००,०००.०० | संशयित व बुडीत कर्ज निधी | ५,००,०००.०० |
| ५०,००,०००.०० | उत्तम जिंदगी कर्ज निधी | ५०,००,०००.०० |
| २,५०,००,०००.०० | भविष्य सहाय्य निधी व अर्जित उत्पन्न | २,५०,००,०००.०० |
| ५,००,०००.०० | वैधानिक/अंतर्गत लेखापरीक्षण शुल्क | ५,००,०००.०० |
| ५,००,०००.०० | कर्मचारी मृत्यू नि. सेवा उपदान व सेवा लाभ निधी | १०,००,०००.०० |
| ७,००,०००.०० | पतपेढी वसूली उत्तेजनार्थ | ९,००,०००.०० |
| २,००,०००.०० | व्याजदर चढ उतार निधी | ४,००,०००.०० |
| १,००,०००.०० | कर/कायदे सल्लागार फी | १,००,०००.०० |
| २,००,०००.०० | विश्रामगृह देखभाल निधी | २,००,०००.०० |
| ३,०००.०० | शिक्षण/प्रशिक्षण निधी | ३,०००.०० |
| - | निवडणूक खर्च तरतूद | १,००,०००.०० |
| १२,२१,९०,०००.०० | | १३,७९,३६,३००.०० |
| ५,४०,८७,९३७.०४ | निव्वळ नफा | ६,११,१४,०१४.७१ |
| **२१,९८,५८,६४८.३४** | **एकूण** | **२४,६५,८२,२६८.०६** |

**प्रमोद रा. तावडे** - कार्याध्यक्ष

**विजय शां. मोरे** - प्रमुख कार्यवाह

## नफा - तोटा पत्रक

| २०२४-२०२५ ₹ पैसे | उत्पन्न तपशील | २०२५-२०२६ ₹ पैसे |
|---|---|---|
| २०,१५,६४,६२९.०० | कर्जावरील व्याज | २२,०२,९३,४५१.०० |
| १,७९,९६,३९३.०० | गुंतवणूक व्याज व बँक बचत व्याज | २,६०,७८,४६३.०० |
| २,२५,९७०.३४ | किरकोळ जमा | २,००,३१६.०६ |
| ७१,६५६.०० | कर्मचारी भ.नि. निधी बँक व्याज | १०,०३८.०० |
| २१,९८,५८,६४८.३४ | एकूण | २४,६५,८२,२६८.०६ |

**सुरेश पां. घोसाळकर** - कोषाध्यक्ष

**सी.ए. प्रदीप मिश्रा ॲण्ड कंपनी** - वैधानिक लेखापरीक्षक

## दिनांक ३१ मार्च २०२६

| २०२४-२०२५ ₹ पैसे | भांडवल व देणी | २०२५-२०२६ ₹ पैसे | २०२५-२०२६ ₹ पैसे |
|---|---|---|---|
| **१०,००,००,०००.००** | **अधिकृत भाग भांडवल** | | **१०,००,००,०००.००** |
| ३,०४,३५,६०२.०० | वसूल भाग भांडवल मा.ता. प्रमाणे | ३,०४,३५,६०२.०० | |
| | अहवालसाली नवीन भरणा | १,४२,०००.०० | |
| | संचित ठेवीतून भागाकडे वर्ग | २६,३४,५००.०० | |
| | अहवालसाली भाग परत | १६,९१,६००.०० | ३,१५,२०,५०२.०० |
| | **राखीव निधी आणि इतर निधी** | | |
| ८,८२,४७,६४७.४० | राखीव निधी (परि. अ.) | | १०,१८,०८,२३२.३८ |
| ३,०१,२०,५०६.०० | विकास निधी (परि. अ.) | | ३,२१,२०,५०६.०० |
| ६,९२,९५७.०० | लाभांश समीकरण निधी (परि. अ.) | | ७,०२,९५७.०० |
| १७,६४,७५१.०० | सहकार संस्कार व धर्मादाय निधी (परि. अ.) | | १८,६५,३५९.०० |
| ५३,७८,३८६.९९ | सभासद कल्याण निधी (परि. अ.) | | ७१,६७,५०१.९९ |
| १,४६,९५,६१३.०० | निवृत्त सभासद कल्याण निधी (परि. अ.) | | १,८८,८९,५१४.०० |
| ९७,०८,६६७.०० | संशयित व बुडीत कर्ज निधी (परि. अ.) | | १,०२,०८,६६७.०० |
| १,००,००,०००.०० | उत्तम जिंदगी कर्ज निधी (परि. अ.) | | १,५०,००,०००.०० |
| ३२,०००.०० | सहकार प्रशिक्षण निधी (परि. अ.) | | ३५,०००.०० |
| ४०,७५,०००.०० | व्याजदर चढ उतार निधी (परि. अ.) | | ४४,७५,०००.०० |
| २,३८,९८,११०.०० | स्थावर मालमत्ता (विश्रामगृह) (परि. अ.) | | २,४४,९८,११०.०० |
| ३२,७५,३५०.२६ | विश्रामगृह देखभाल निधी (परि. अ.) | | ३४,७५,३५०.२६ |
| १,६२,७३,५०५.०० | विश्रामगृह (इमारत) घसारा निधी (परि. अ.) | | १,७७,३२,३१६.०० |
| २१,८८,१६,६८८.०० | सभासद भविष्य सहाय्य निधी वर्गणी (परि. अ.) | | २५,५८,८७,५७३.०० |
| २,००,०००.०० | शिष्यवृत्ती निधी (परि. अ.) | | २,००,०००.०० |
| ३८,५२,६०,४८०.०० | संचित ठेव (परि. ब.) | | ४१,५४,९२,९२०.०० |
| ११९,८१,१८,५२४.०० | मुदत ठेव (परि. ब.) | | १३७,७६,०३,६८१.०० |
| १,०३,६१,८५५.०० | आवर्त ठेव (परि. ब.) | | १,१२,७२,६५५.०० |
| ३,८३,९४१.०० | मुदत ठेव (सुवर्णमहोत्सव) (परि. ब.) | | ३,४६,०७०.०० |
| ३७,६३,२५७.०० | मुदत ठेव (हिरकमहोत्सव) (परि. ब.) | | ३६,९५,६५८.०० |
| १७,४०,०००.०० | जागा अधिग्रहण निधी तरतूद | १७,४०,०००.०० | |
| | अहवालसाली तरतूद | २,४०,०००.०० | १९,८०,०००.०० |
| ३,४७,७८,०११.०० | संचित ठेव व्याज शिल्लक | ३,४७,७८,०११.०० | |
| | अहवालसाली तरतूद | ३,५३,३९,०००.०० | |
| | अहवालसाली वाटप | ३,२३,७२,३७०.०० | ३,७७,४४,६४१.०० |
| ५,६५,३९,०००.०० | मुदत ठेव व्याज | ५,६५,३९,०००.०० | |
| | अहवालसाली तरतूद | ६,८३,०५,२००.०० | |
| | अहवालसाली वाटप | ५,६५,३९,०००.०० | ६,८३,०५,२००.०० |
| **२१४,८५,५९,८५१.६५** | **पुढील पानावर** | | **२४४,२०,२७,४१३.६३** |

## अखेरचे ताळेबंद पत्रक

| २०२४-२०२५ ₹ पैसे | मालमत्ता व येणी | २०२५-२०२६ ₹ पैसे | २०२५-२०२६ ₹ पैसे |
|---|---|---|---|
| ७९,३७,४८२.५० | **रोख व बँकेतील शिल्लक** | | |
| | रोख शिल्लक | - | |
| | बँक ऑफ महाराष्ट्र (चालू खाते) | १४,५९,५२०.६६ | |
| | बँक ऑफ महाराष्ट्र (बचत खाते) | ५१,५६४.५२ | |
| | बँक ऑफ महाराष्ट्र (बचत खाते) | ४,६०९.४२ | |
| | स्टेट बँक ऑफ इंडिया (चालू खाते) | ५,८६,८७३.०९ | |
| | ॲक्सिस बँक (बचत खाते) | ११,२८,७१०.१४ | |
| | ॲक्सिस बँक (लाभांश बचत खाते) | ३३,१८५.६१ | |
| | ॲक्सिस बँक (चालु खाते) | १,०३,४१६.८० | |
| | बँक ऑफ बड़ौदा (बचत खाते) | ३,२११.६६ | |
| | स्टेट बँक ऑफ इंडिया (चालू खाते) माझगांव | ६,७२,९७०.०१ | |
| | मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक | ४९,१०,८४४.६१ | |
| | महाराष्ट्र राज्य सहकारी बँक (कर्मचारी भ.नि.नि.) | ४,००,७९२.४२ | ९३,५५,६९८.९४ |
| ६,१३०.०० | **अधेसिव्ह स्टॅम्प** | | २१,३८५.०० |
| | **भाग** | | |
| १५,६४,५००.०० | मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक | १५,६१,०००.०० | |
| | लोकमित्र सहकारी मुद्रणालय | २,५००.०० | |
| | मुंबई पगारदार सहकारी पतसंस्था | ५००.०० | |
| | मुंबई कोकण पगारदार पतसंस्था महासंघ | ५००.०० | १५,६४,५००.०० |
| | **गुंतवणूक** | | |
| २६,४२,३७,१०८.०० | **मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक/म.स.बँक** | | |
| | अल्प मुदत ठेव | ११,९९,२४,३५४.०० | |
| | राखीव निधी | १०,१७,७०,६०६.०० | |
| | संशयित व बुडीत कर्ज निधी | ९७,११,९१६.०० | |
| | कर्मचारी मृत्यू नि सेवा उपदान व सेवा लाभ निधी | ७०,७६,०००.०० | |
| | सभासद भविष्य सहाय्य निधी | ६,०८,२६,२०६.०० | |
| | लाभांश समीकरण निधी | ७,०३,४३५.०० | |
| | सहकार संस्कार व धर्मादाय निधी | १९,४६,८३२.०० | |
| | विकास निधी | १,२१,०८,३०१.०० | |
| | सभासद कल्याण निधी | १,१६,५०,५१८.०० | |
| **२७,३७,४५,२२०.५०** | **पुढील पानावर...** | | **१,०९,४१,५८३.९४** |

## दिनांक ३१ मार्च २०२६

| २०२४-२०२५ ₹ पैसे | भांडवल व देणी | २०२५-२०२६ ₹ पैसे | २०२५-२०२६ ₹ पैसे |
|---|---|---|---|
| २१४,८५,५९,८५१.६५ | **मागील पानावरून** | | २४४,२०,२७,४१३.६३ |
| ३,०८,०००.०० | आवर्त ठेव व्याज | ३,०८,०००.०० | |
| | अहवालसाली तरतूद | ३,४९,१००.०० | |
| | अहवालसाली वाटप | ३,०८,०००.०० | ३,४९,१००.०० |
| ४६,१९०.०० | सुवर्ण महोत्सव मुदत ठेव व्याज | ४६,१९०.०० | |
| | अहवालसाली तरतूद | - | |
| | अहवालसाली वाटप | ३,६८८.०० | ४२,५०२.०० |
| १५,९६,८३,१६८.०० | सभासद भ.स. निधी व अर्जित उत्पन्न (परि. ड) | १५,९६,८३,१६८.०० | |
| | सन २०२४-२०२५ च्या नफ्यातून वर्ग | २,५२,००,०००.०० | |
| | अहवालसाली तरतूद जमा | २,५०,००,०००.०० | |
| | सभासद भविष्य सहाय्य वर्गणीतून वर्ग जमा | ३,७१,०३४.०० | |
| | अहवालसाली खर्च (६ वारसांना परतावा)(-) | ६२,१९,८३०.०० | |
| | भविष्य सहाय्य निधी ५% बोनस व्याज वाटप(-) | ९८,६८,४२२.०० | १९,४१,६५,९५०.०० |
| ६७,९९,४४०.०० | कर्मचारी मृत्यू नि सेवा उपदान व सेवा लाभ | ६७,९९,४४०.०० | |
| | अहवालसाली तरतूद | १०,००,०००.०० | |
| | अहवालसाली परतावा | - | ७७,९९,४४०.०० |
| ७,३५,७७२.०० | कर्मचारी अं.भ.नि.नि.मा.ता. प्रमाणे | ७,३५,७७२.०० | |
| | अहवालसाली पतपेढी जमा | १,२५,६१३.०० | |
| | अहवालसाली भ.नि.नि. (भत्ता) फरक जमा | १३,२७०.०० | |
| | अहवालसाली म.स. बँक बचत खातेवरील व्याज | १०,०३८.०० | |
| | अहवालसाली कर्मचारी परतावा वसूली | ६०,०००.०० | |
| | अहवालसाली म.स. बँकेत गुंतवणूक | ३,३०,०००.०० | ६,१४,६९३.०० |
| ३०,३५,०००.०० | कर्मचारी अं.भ.नि.नि.मा.ता. प्रमाणे (मुदत ठेव) | ३०,३५,०००.०० | |
| | अहवालसाली जमा | ३,३०,०००.०० | |
| | अहवालसाली परतावा | - | ३३,६५,०००.० |
| १८,०३,३६०.०६ | वैधानिक/अंतर्गत लेखापरीक्षण शुल्क तरतूद | १८,०३,३६०.०६ | |
| | अहवालसाली तरतूद | ५,००,०००.०० | |
| | अहवालसाली खर्च | ५,०७,१६८.०० | १७,९६,१९२.०६ |
| १६,२५,८९८.०० | कर कायदे सल्लागार फी तरतूद | १६,२५,८९८.०० | |
| | अहवालसाली तरतूद | १,००,०००.०० | |
| | अहवालसाली खर्च | - | १७,२५,८९८.०० |
| ८,१५,९५६.०० | पतपेढी वसूली उत्तेजनार्थ मा. ता. प्रमाणे | ८,१५,९५६.०० | |
